


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : ४१ वा गुरूवार दि. १३ मार्च २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

## बुलढाणा तालुक्यात थरकाप उडविणारी घटना...

# डोक्यात टामि घालून हत्या!

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रोध अग्नीपेक्षाही ज्वलनशील असतो, याची प्रचिती पुन्हा एकदा आली. जुन्या वादातून लाल माती फाट्यावर अनिल प्रल्हाद बावस्कर (रा. पन्हेरा) यांची निघृण हत्या करण्यात आली. आरोपी प्रदीप गोविंदा कुळे (वय ३५) याने लोखंडी टामीने थेट त्यांच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला, त्यामुळे बावस्कर हे जागीच कोसळले आणि रक्तस्त्राव होऊन त्यांचा मृत्यू झाला. आरोपी कुळेला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याला धामणगाव पोलीस स्टेशन येथे आणले गेले आहे. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्ल्यानंतर आरोपीने



घटनास्थळावरून पळ काढला होता. परंतु पोलिसांनी तातडीने त्याच्या मुसक्या आवळल्या. प्राथमिक माहितीनुसार ही हत्या जुन्या वादातून झाल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली होती. विशेष म्हणजे ज्यांची हत्या झाली ते अनिल बावस्कर आणि आरोपी प्रदीप कुळे दोघेही एकाच गावचे म्हणजे पान्हेरा येथील राहणारे आहे.

# बुलढाण्यात शिवसेनेची होळी, पण लाकडे काँग्रेसची!

## शिंदे गटात संजय राठोड? व्हायरल फोटोने चर्चेला उधाण!

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाण्यात शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड काँग्रेसच्या नेत्यांना आपल्या पक्षात खेचण्याचा सपाटा लावत आहेत. शिवसेनेची होळी, पण लाकडे काँग्रेसची विजय अंभोरे आणि ॲड. गणेश सिंग राजपूत यांच्या प्रवेशानंतर आता काँग्रेसचे राज्य उपाध्यक्ष संजय राठोड यांचा शिवसेनेत जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत त्यांचा फोटो व्हायरल झाल्याने चर्चांना अधिक जोर आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, राठोड यांनी विधान परिषद किंवा महामंडळाच्या पदाची मागणी केली आहे. यवतमाळचे संजय राठोडही त्यांना पाठिंबा देत असल्याचे कळते. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या



नेतृत्वावर नाराजी, आमदार संजय गायकवाड यांची शिष्टाई, की वैयक्तिक महत्त्वाकांक्षाराठोड यांच्या निर्णयामागचे नेमके कारण स्पष्ट नाही. गेल्या काही दिवसांत काँग्रेसच्या बड्या नेत्यांचा शिवसेनेत प्रवेश वाढला असून, आ.गायकवाड यांनी काँग्रेससाठी मोठा धक्का देण्याची तयारी केली आहे. आता त्यांच्या या हालचालींवर काँग्रेस नेते मुकुल वासनिक काय भूमिका घेतात, याकडे साऱ्यांचे लक्ष आहे.

# शिक्षकांचे दुर्लक्ष? भादोला शाळेत ११ विद्यार्थ्यांचे हातावर ब्लेडने वार!

**जनसंचलन/ भादोला**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पाचवीतील ११ विद्यार्थ्यांनी हातावर ब्लेडने जखमा करून घेतल्याने पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या शाळेत एकूण ११ शिक्षक असून विद्यार्थ्यांकडे सतत दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. पालकांनी शिक्षण अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई झाली नाही. संतप्त पालकांनी मुलांना शाळेत पाठविण्यास नकार देत शाळा बंद आंदोलन पुकारले. मात्र, मुजोर शिक्षकांना याचा कोणताही परिणाम झाला नाही. अखेर पालकांनी पत्रकारांकडे धाव घेत अन्यायाविरोधात आवाज उठवला. प्रत्यक्ष चौकशीत धक्कादायक बाबी समोर आल्या. शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवत नसून अनेकांना स्वतःचे नावही लिहिता-वाचता येत नाही. शाळा व्यवस्थापन समितीने यावर ठोस आरोप केले आहेत. केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांनी कधीही शाळेला भेट दिली नसल्याचे समोर आले. विद्यार्थ्यांनी हा प्रकार खेळताना केल्याचे सांगण्यात आले, मात्र शिक्षकांच्या बेफिकिरीमुळेच हा प्रकार घडल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्याध्यापकांनी काही शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत. शिक्षणाधिकारी खरात यांनी तत्काळ




कारवाई करत शेख या शिक्षकाला निलंबित केले असून गणित-विज्ञान शिक्षक जठाळ सर यांची बदली करण्यात आली आहे. मानसोपचार तज्ज्ञांच्या मते, हा प्रकार मुलांमध्ये वाढत्या मानसिक असंतुलनाचा परिणाम असून, वेळीच समुपदेशन न झाल्यास भविष्यात गंभीर गुन्हेगारी प्रवृत्ती वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. आता प्रशासन जागे होणार का? पालकांना न्याय मिळणार का? हा प्रश्न अनुत्तरित आहे!

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बंधुभाव व एकतेचे प्रतिक म्हणजे - होळी

## संपादकीय लेख

प्राचीन भारतात होळी हा रंग, प्रेम आणि वसंत ऋतूचा सण म्हणून साजरा केला जाणारा लोकप्रिय आणि महत्त्वाचा हिंदू सण आहे. वसंत ऋतुच्या आगमनाप्रसंगी निसर्गाने अधिकच साजशृंगार केलेला असतो. फुललेल्या फुलाला कोमलतेचा बहार आलेला असतो. झाडं पाना-फुलांनी नववधुगत बावरुन गेलेली असतात आणि पक्षाचं आकाशात झुलायचं स्वप्नही साकार झालेलं असतं. निसर्गाच्या तारुण्याचे हिरवेपण पाहून माणसाचं मन बहरुन आनंदून आलेलं असतं. वसंतोत्सव हा कालांतराने होळी दहनाच्या रुपाने साजरा होऊ लागला. उत्सवाचं स्वरुप जरी बदललं तरी उद्देश धोरण तोच आहे. प्रसन्नता, आनंद, मस्ती या दिवसात मन उचंबळून आलेलं असतं. लहान मुलांना पीडा देणाऱ्या ङ्गहोलिकाफ, ङ्गढुंढाफ, ङ्गपुतनाफ ह्यांसारख्या राक्षसींच्या दहनांच्या कथांमधे ह्या उत्सवाच्या परंपरेचा शोध काही लोक घेतात. एका पौराणिक कथेनुसार भगवान विष्णूचा भक्त असलेल्या प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूने धाडलेल्या होलिकादेवतेचा श्रीविष्णू देवाने वध केला होता. होलिकेला वर होता की तिला अग्नी जाळू शकणार नाही, परंतु प्रल्हादाला जाळण्यासाठी तिने त्याला मांडीवर घेऊन अग्निकुंडात प्रवेश केला. प्रल्हाद बचावला व होलिकेचे दहन झाले अशी आख्यायिका प्रचलित आहे. अशाप्रकारे हिंदूंच्या इतर सणाप्रमाणे होलिका दहन देखील वाईटावर चांगल्याचा विजयाचे चांगले प्रतीक आहे. कारण तो हिरण्यकश्यपूवर नरसिंहाच्या रूपात विष्णूच्या विजयाचे स्मरण करतो. वाईट गोष्टींवर विजय मिळवणे ही या सणाची व्याख्या आहे. या प्रकारे होळीची उत्पत्ती झाली आणि ती प्रामुख्याने भारतीय उपखंडात साजरी केली जाते.

होळी भारतात वसंत ऋतूचे आगमन, हिवाळ्याचा शेवट आणि प्रेमाचा बहर साजरी करते. हे वसंत ऋतु कापणीच्या चांगल्या हंगामासाठी देखील एक आवाहन आहे. हे एक रात्र आणि एक दिवस चालते, हिंदू पंचांग फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेच्या संध्याकाळी (पौर्णिमेचा दिवस) चालू होतो, जो इंग्रजीब ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये मार्चच्या मध्यभागी येतो. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण लोक आनंदाने साजरा करतात. या उत्सवाला ङ्गहोलिकादहनफ किंवा ङ्गहोळी पौर्णिमाफ, ङ्गशिमगाफ, ङ्गहुताशनी महोत्सवफ, फाग, फागुन ङ्गदोलायात्राफ, ङ्गकामदहनफ अशा वेगवेगळ्या संज्ञा आहेत, ज्याला कोकणात शिमगो म्हणतात. फाल्गुन महिन्याच्या शेवटच्या दिवशी साजरा होणाऱ्या ह्या लोकोत्सवाला ङ्गफाल्गुनोत्सवफ आणि दुसऱ्या दिवशी सुरू होणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनानिमित्त ङ्गवसंतागमनोत्सवफ किंवा ङ्गवसंतोत्सवफ असेही म्हणण्यात येते. देशीनाममाला या ग्रंथात हेमचंद्र याने या सणालाला सुग्रीष्मक असे नाव दिले आहे. यातूनच ङ्गशिमगाफ असा अपभ्रंश तयार झाला असावा असे मानले जाते.

भारताचा सांस्कृतिक सण म्हणजे होळी ! अंतःकरणातील अपार प्रेमाने रंग गुलालाची उधळण करणारा. रंगोन्मादानं भारतीय मातीत अंर्तबाहय मस्ती भरणारा. प्रांत, भाषा व धर्माच्या विभिन्न रंगांच्या सरितांना राष्ट्रीय रंगस्थळीच्या त्रिवेणीत एकात्मतेच्या रंगानं प्रवाहित करणारा हा राष्ट्रीय सण. होळी-धुळीवंदन सणाला महाराष्ट्रात धामधुम, युवकांचा जल्लोष, मादक द्रव्यांचा सर्रास वापर व आहारी जात या सणाची सणसण समाजात पसरवितांना दिसतात. होळीच्या दिवशी राजा आणि प्रजा एक होऊन एकमेकांवर रंग उडवितात ते काय निदान वर्षाचे चार-पाच दिवस तरी समानतेचे तत्व अनुभवण्यासाठी? मानवी आरोग्यावर होणारे ऋतुचे परिणाम याचा संकेत देणारा सण आहे, निसर्ग आनंदाचा सण आहे. होळीमध्ये एकमेकांना विविध रंग लावून हा सण साजरा करतात. तसेच विविध पारंपरिक गाणी, पारंपरिक नृत्ये यामध्ये समाविष्ट असतात. बंजारा समाजामध्ये होळीला फार महत्त्व आहे. बंजारा समाजामध्ये, बंजारा भगिनी पारंपरिक पोशाखात नृत्य करतात. विशेषतः उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. याला वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते.

भारताच्या निरनिराळया राज्यात निरनिराळया प्रकारे होळी करतांना दिसतात. परंतू होळी पेटविण्याचा प्रकार सर्वच ठिकाणी सारखाच होत असतो. महाराष्ट्रात शेणाच्या गोवऱ्यांची किंवा लाकडांची होळी करण्याची प्रथा आहे. कोकणपट्टीत सुपारीचे झाड, आंब्याचे किंवा इतर कुठल्याही झाडांचा सोट देवळापूढे रोवून त्यांच्या तळाशी लहान-लहान लाकडे व गवत जाळतात. इतर प्रदेशाच्या मानाने महाराष्ट्रातील कोकणपट्टीत या सणाला बरेच महत्व आहे. गोव्यात काही ठिकाणी वायंगणी शिमगा म्हणजे चैत्र शुक्ल पक्षात देखील घुमट (मडक्याचे वाद्य) वाजविले जावून जल्लोशात होळी सण साजरा करतांना आढळतात. होळी हा रंगाचा आणि कृषी संस्कृतीचे जतन करणारा सण आहे. शेतकरी वर्गात होळी या सणाचे खास महत्त्व आहे. पौराणिक इतिहास पाहता या सणाचे आणा कृष्ण-बलराम यांचे नाते दिसून येते. होळीच्या निमित्ताने या दोन्ही देवतांचे स्मरण आणि पूजा करतात. यादिवशी हाती आलेल्या पिकाबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना करतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी गव्हांच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याचीही प्रथा आहे. आदिवासी जमातीतील स्त्री-



पुरुष हा दिवस गुलाल उधळून, टिमक्या-ढोल वाजवून, नृत्य करून उत्साहाने साजरा करतात. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील लोकांत होळी हा सण उत्साहाने साजरा केला जातो. होळी साजरा करत असतांना आदिवासी लोकांच्या भोजनामध्ये गोड पुरी, मासळी व गोड भात या पदार्थांचा समावेश असतो. सातपुडा पर्वत प्रदेशातील आदिवासी होळीच्या दरम्यान काठी उत्सव साजरा करतात. बाराव्या शतकापासून ही परंपरा सुरू असल्याचे दिसते. दागदागिने घालून, नक्षीकाम करून स्त्री-पुरुष यात सहभागी होऊन विविध वाद्यांच्या तालावर नृत्य करतात.

महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळतात येतात आणि पेटलेल्या होळीभोवती ङ्गबोंबाफ मारत लोक प्रदक्षिणा घालतात. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची रीत आहे. होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला ङ्गधुळवडफअसेही म्हणतात. या दिवशी होळीची रक्षा अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळण घेतली जाते. होळीनंतर ५ दिवसांनी रंगपंचमी हा सण साजरा केला जातो. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पहिले जाते. होळी हा रंगाचा सण आहे, समस्त समुदाय होळीची विधियुक्त पूजा करतो. होळी समोर गाऱ्हाणे, नवस बोलण्याची परंपरा आहे. नागपूरकर भोसल्यांच्या वाड्यात व तसेच पेशवाईत खेळली जाणारी होळी आणि रंगपंचमी तर महाराष्ट्राच्या इतिहासात सुप्रसिध्दच आहे. स्वतंत्र भारतात होळीची प्रथा पंडित जवाहरलाल नेहरुंजी पण जोपासली, जपली ! प्रेम आणि आनंद पसरवणे आपण या सणाचा स्वीकार करत असताना, या मनःपूर्वक शुभेच्छांसह प्रेम आणि आनंद पसरवू या. या प्रसंगी सर्वांना सुरक्षित होळी आणि धुलीवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा !

# राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम; प्रवाश्यांच्या समस्या व निराकरणासाठी दर सोमवार व शुक्रवारी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन...

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या सोमवार व शुक्रवारला सकाळी १० ते २ या वेळेत प्रवासी राजा दिनफ्फ व दुपारी ३ ते ५ या वेळेत कामगार पालक दिनफ्फ आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने मार्च महिण्यासाठी वेळापत्रक जाहिर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाचे कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे. परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत




प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सांयकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यारी वैयक्तिक प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तात्काळ निराकरण करतील. बुलडाणा विभागातील चिखली आगार येथे सोमवार दि. १७ मार्च २०२५ रोजी, खामगांव आगार येथे शुक्रवार दि. २१ मार्च, मेहकर आगार येथे सोमवार दि. २४ मार्च, मलकापूर आगार येथे शुक्रवार दि. २८ मार्च, जळगांव जामोद येथे शुक्रवार दि. ४ एप्रिल व शेगांव आगार येथे सोमवार दि. ७ एप्रिल रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अश्लील गाणी नको, अनोळखी व्यक्तीवर रंग फेकल्यास... होळीसाठी पोलिसांकडून नियमावली जारी...

**मुंबई :** राज्यभरात सध्या होळीचा उत्साह पाहायला मिळत आहे. उद्या होळी ( २०२५) आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी धुलिवंदन आहे. त्यामुळे राज्यासह देशभरातील बाजारपेठांमध्ये गर्दी बघायला मिळत आहे. अनेक जण होळीसाठी रंग खरेदी करत आहेत. तर अनेक जण पूजेचं सामान खरेदी करत आहेत. होळी सणाच्या दुसऱ्या दिवशी रंगपंचमी साजरी केली जाते. पण अनेकदा रंगपंचमी सादर करत असताना या सणाला गालबोट लागतं. काही अनपेक्षित घटना या दिवशी घडतात. त्यामुळे अशा घटनांपासून सर्वसामान्य नागरिकांचा बचाव व्हावा यासाठी मुंबई पोलिसांनी काही महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहे. पोलिसांनी जारी केलेल्या सूचना आणि नियमांचं पालन केलं नाही तर कठोर कारवाईला सामोरं जावं लागेल. होळी सण आणि रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी नियमावली जारी केली आहे. सध्या मुस्लिम समाजाचा रमजान महिना सुरु आहे. त्यामुळे पोलिसांकडून होळी आणि धुलिवंदनासाठी खबरदारी घेत काही महत्त्वाचे नियम जारी करण्यात आले आहेत. ही नियमावली १२ मार्च ते १८ मार्चपर्यंत जारी असणार आहे.

**होळीसाठी नेमकी नियमावली काय?**

होळीच्या दिवशी किंवा धुलिवंदनाच्या दिवशी देखील विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येतं. या दिवशी लाऊडस्पीकरवर गाणी लावली जातात. पण अशावेळी अश्लील गाणी लावण्यास बंदी आहे. अर्थात अश्लील गाणी लावणं हे अयोग्यच आहे. ते नैतिकतेत बसत नाही. पण तरीही अनेकांकडून अशाप्रकारचं विकृत कृत्य केलं जातं. ही बाब लक्षात घेऊन मुंबई पोलिसांनी




अश्लील गाणी वाजवल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

होळी आणि रंगपंचमी साजरा करत असताना समाजात तेढ निर्माण होईल, असं कृत्य करु नका, असं पोलिसांकडून आवाहन करण्यात आलं आहे. धुलिवंदनाच्या दिवशी अनेकांकडून बेशिस्तपणे वागलं जातं. काही जण रस्त्याने ये-जा करणाऱ्या अनोळखी व्यक्तीवर रंग फेकतात, अनेक जण अनोळखी व्यक्तीवर पाण्याचे फुगे किंवा पिशव्या फेकतात. यामुळे वाद होतो. त्यामुळे असे वाद टाळण्यासाठी मुंबई पोलिसांनी नियमावली जारी केली आहे. अनोळखी व्यक्तींवर रंग फेकल्यास कारवाई केली जाईल, असं पोलिसांकडून बजावण्यात आलं आहे. होळी साजरा करण्यासाठी काही परिसरात तरुणांकडून सार्वजनिक वर्गणी मागितली जाते. यासाठी जबरदस्ती देखील केली जाते. पण होळी आणि रंगपंचमीनिमित्त जबरदस्ती वर्गणी मागणाऱ्यांवरही कारवाई केली जाणार आहे. पोलिसांची सर्वात महत्त्वाची देखील सूचना केली आहे. रंगाने किंवा पाण्याने भरलेले फुगे फेकल्यास कारवाई होईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.



# दाम्पत्यातील वाद विकोपाला; पतीचं भयंकर कृत्य, पत्नीला थेट...

## पालघरमधील थरकाप उडवणारी घटना

**पालघर :** पतीने पत्नीची दगडाने ठेचून हत्या केल्याची धक्कादाक घटना समोर आली आहे. पालघर जिल्ह्यातील थेरोंडा - धापशीपाडा येथे ही घटना घडली आहे. गुलाब सुरेश भोईर (वय ५८) असे मृत महिलेचे नाव असून या पत्नीची हत्या करणाऱ्या आरोपी पतीला कासा पोलिसांनी अटक केली आहे. सुरेश रामा भोईर (वय ५८) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यातील थेरोंडा - धापशीपाडा येथे सुरेश रामा भोईर आणि त्याची पत्नी गुलाब सुरेश भोईर असे दांपत्य वास्तव्यास होते. दोघांचं लग्न होऊन ३५ वर्ष झालेली होती. पती आणि पत्नी दोघांनाही दारू पिण्याचे व्यसन होते. सुरेश भोईर याने त्याची पत्नी गुलाब हिला तू घरातून बाहेर का जाते? खरे सांग असे विचारले. यावरून रविवारी सायंकाळी चार वाजताच्या सुमारास दोघा पती आणि पत्नीमध्ये वाद झाला. वाद इतका टोकाला गेला की पतीने पत्नीला मारहाण केली. तिला इतकी मारहाण केली, की पत्नीचा यात मृत्यू झाला.त्यानंतर पती सुरेश भोईर याने पत्नीला लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. नंतर रागाच्या भरात दगड घेऊन पत्नीच्या डोक्यावर, छातीवर आणि पाठीवर वार केले. पतीने दगडाने डोक्यात, छातीवर वार केल्याने गंभीररीत्या पत्नी जखमी झाली. याच मारहाणीत पत्नी गुलाब भोईर हिचा मृत्यू झाला आहे.याप्रकरणी कासा पोलीस ठाण्यात आरोपी सुरेश रामा भोईर याच्या विरोधात भारतीय न्यायसंहिता २०२३ च्या कलम १०३ (१), ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्नीची हत्या करणाऱ्या आरोपी सुरेश भोईर याला पोलिसांनी अटक केली असून अधिक तपास कासा पोलीस करत आहेत. मात्र या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून महिलेच्या मृत्यूने नागरिकांकडून हळहळ व्यक्त होत आहे.

# कोर्टाने पोलिसांची मागणी फेटाळली, महापुरुषांबद्दल अपशब्दांचा प्रयोग करणाऱ्या प्रशांत कोरटकरला जेल की बेल?

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य करण्याचा आरोप तथा इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत धमकी प्रकरणावर कोल्हापूर सत्र न्यायालयात आज सुनावणी झाली. कोल्हापूर जिल्हा न्यायाधीश क्रमांक - २ डी. व्ही. कश्यप यांच्या समोर ही सुनावणी पार पडली. आजच्या सुनावणीला न्यायालयात केवळ सरकारी वकील विवेक शुक्ल हे उपस्थित होते. तसेच तपास अधिकारी पोलीस निरीक्षक संजीवकुमार झाडे, पोलीस उपनिरीक्षक गळवे हे देखील कोर्टरूममध्ये हजर होते. यावेळी न्यायालयाने प्रशांत कोरटकर याला प्रत्यक्ष सुनावणीला उपस्थित राहण्याची आवश्यकता




नसल्याचं निरीक्षण नोंदवलं. यावेळी न्यायालयाने सरकारी वकिलांची भूमिका ऐकून घेतली. तसेच याप्रकरणी १७ मार्चपासून दररोज सुनावणी होईल, असं जाहीर केलं. तोपर्यंत प्रशांत कोरटकर याला अटकेपासून संरक्षण मिळालं आहे. त्यामुळे प्रशांत कोरटकरला १७ मार्चपर्यंत दिलासा मिळाला आहे. कोल्हापूर पोलिसांनी न्यायालयात आरोपी प्रशांत कोरटकर याला सुनावणीवेळी प्रत्यक्ष हजर राहण्याची सूचना देण्याची विनंती केली. पण न्यायालयाने पोलिसांची विनंती फेटाळून लावली. प्रशांत कोरटकरला प्रत्यक्ष सुनावणीला हजर राहण्याची आवश्यकता नाही, असं न्यायालयाने म्हटलं. प्रशांत कोरटकरच्या जामीन अर्जावर १७ मार्चपासून सुनावणी होईल, असं कोर्टाने म्हटलं.दरम्यान, पोलिसांनी न्यायालयात कालच्या सुनावणीवेळी देखील महत्त्वाची भूमिका मांडली होती. प्रशांत कोरटकरच्या मोबाईलमध्ये जो डेटा डिलीट केलाय तो परत मिळवण्यासाठी प्रशांत कोरटकर हा आवश्यक आहे. त्याची उपस्थिती खूप महत्त्वाची आहे. पण त्याचवेळी आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, प्रशांत कोरटकर यांच्या जीवाला धोका उद्भवू शकतो. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे आम्ही ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहू, असं प्रशांत कोरटकरचे वकील सौरभ घाग यांनी न्यायालयात म्हटलं होतं.न्यायालयाने प्रशांत कोरोटकरच्या वकिलांचा मुद्दा ग्राह्य धरत पोलिसांची मागणी धुडकावून लावली. विशेष म्हणजे न्यायालयाने आज सुद्धा कोरटकरला प्रत्यक्ष सुनावणीला हजर राहण्याची गरज नाही, असं म्हटलं. दरम्यान, न्यायालयाने याआधी प्रशांत कोरकरटला दिलासा दिला होता. त्यामुळे कोरटकरला अटकेपासून संरक्षण मिळालं होतं.त्यानंतर आज न्यायालयाने कोरटकरच्या जामीन अर्जावर १७ मार्चपासून नियमित सुनावणी होणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. त्यामुळे न्यायालयाचा आधीचा आदेश १७ मार्चपर्यंत लागू राहणार आहे. त्यामुळे कोरटकरला एकप्रकारे दिलासाच म्हणता येईल. यानंतर कोरटकरला १७ मार्चला जामीन मिळतो का की त्याचा जामीन अर्ज फेटाळला जातो? ते पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

# जेव्हा लाडक्या लक्ष्याची अशोक... अशी हाक ऐकू येते

## सन्मान सोहळ्यात भावुक झाले अशोक सराफ...

**मुंबईः** स्टार प्रवाह परिवार पुरस्कार सोहळ्याची सध्या सर्वत्र चर्चा रंगली असून येत्या १६ मार्चला हा सोहळा टेलिव्हिजनवर पाहता येणार आहे. अलिकडेच या सोहळ्याचे चित्रिकरण पार पडले आणि या कार्यक्रमातील विविध प्रोमोही सोशल मीडियाद्वारे समोर आले आहेत. टेलिव्हिजनवर प्रक्षेपण करण्यात येणार आहे. यंदा या सोहळ्याचं पाचवं वर्ष आहे. या कार्यक्रमासाठी अनेक दिग्गज पाहुण्यांनी उपस्थिती लावली होती. या सोहळ्याच्या पाचव्या वर्षी महाराष्ट्रभूषण अशोक सराफ, ज्येष्ठ अभिनेत्री निवेदिता सराफ, वर्षा उसगांवकर, निशिगंधा वाड आणि यांच्यासह बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित, दिग्दर्शक महेश कोठारे असे अनेक मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या उपस्थितीत महाराष्ट्राच्या लाडक्या अशोक मामांचाही खास सन्मान करण्यात आला. अशोक सराफ यांना गेल्यावर्षी महाराष्ट्र भूषण या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. तर, यंदाच्या प्रजासत्ताक दिनी त्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला. यानिमित्ताने स्टार प्रवाह वाहिनीकडून त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. मामांसोबत काम केलेल्या त्यांच्या नायिकांनी म्हणजेच निवेदिता सराफ, किशोरी अंबिये, वर्षा उसगांवकर आणि निशिगंधा वाड यांनी त्यांचे औक्षण केले आणि अशोक सराफांविषयी त्या भरभरुन बोलल्या. महेश कोठारे यांनीही त्यांच्या लाडक्या मित्राचे कौतुक केले. मामांचा हा कौतुक सोहळा पाहण्यासाठी त्यांचे कुटुंबीयदेखील उपस्थित होते.अशोक सराफ यांच्या या कौतुक सोहळ्यासाठी त्यांच्या एका मित्राची कमतरता नक्कीच सर्वांना



जाणवली आणि हा मित्र म्हणजे दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे. लक्ष्या मामा असते तर ते अशोक सराफांना काय म्हणाले असते, असे एक सेगमेंट या कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेले, त्याचा एक प्रोमो वाहिनीकडून शेअर करण्यात आला. अशोक यांच्या सन्मानावेळी त्यांना एक फोन येतो आणि समोरुन एक व्यक्ती लक्ष्या मामांच्या आवाजात त्यांच्याशी संभाषण करते, असे या प्रोमोत दाखवण्यात आले. त्यावेळी उपस्थितांसह अशोक सराफही खूप भावुक झाले.फोनची रिंग वाजल्यानंतर, हॅलो हॅलो हॅलो... अशोक... अशी हाक ऐकू येते. समोरुन लक्ष्या मामा असे म्हणतात की, अरे जवळपास ५० चित्रपट आपण एकत्र केले, मज्जा... तुझा आज होणारा सन्मान बघून डोळे भरुन आले बघ. हा लक्ष्या या अशोकशिवाय नेहमीच अपूर्ण राहील. अशोक मामांसह सर्वांच्याच डोळ्यात यावेळी तरळते. स्टार प्रवाहकडून शेअर करण्यात आलेल्या या प्रोमोवर चाहत्यांनी लक्ष्मीकांत आणि अशोक सराफ या जोडीचे कौतुक करणाऱ्या असंख्य कमेंट केल्या आहेत.

# १० ते १५ किन्नरांनी रेल्वेच्या डब्यात हैदोस माजवला, जीवाच्या भीतीने टीटीई टॉयलेटमध्ये लपला, अखेर....

**नागपूर :** नागपूर-गोंदिया रेल्वे मार्गात एका धक्कादायक घटनेत तिकीट तपासणी अधिकाऱ्यावर (टीटीई) जीवघेणा हल्ला करण्यात आला. ही घटना सोमवारी दुपारी गोंदिया रेल्वे स्थानकावर घडली. विदर्भ एक्सप्रेस प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर थांबलेली असताना, सुमारे १० ते १५ किन्नरांनी टीटीईवर हल्ला केला. या घटनेमुळे रेल्वे सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. टीटीईचा पाठलाग करून टॉयलेटमध्ये घुसण्याचा प्रयत्न मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित टीटीईने रेल्वेत विनातिकीट प्रवास करणाऱ्या किन्नरांकडून नियमानुसार दंड वसूल केला होता. मात्र, यामुळे संतप्त झालेल्या किन्नरांनी टीटीईचा पाठलाग केला. स्वतःचा जीव वाचवण्यासाठी टीटीईने एसी कोचच्या टॉयलेटमध्ये आसरा घेतला, पण संतप्त किन्नरांनी टॉयलेटचा दरवाजा ठोठावत त्याला बाहेर येण्याची धमकी दिली.सूत्रांच्या माहितीनुसार, टीटीईवर हल्ला होण्यामागे रेल्वेमधील अवैध विक्रेत्यांची भूमिका असू शकते. टीटीईने अवैध वसुली रोखल्याने आणि नियमांची अंमलबजावणी केल्याने हा हल्ला घडल्याचा संशय आहे. काही विक्रेत्यांनी किन्नरांना टीटीईच्या स्थानाची माहिती दिल्याचेही बोलले जात आहे. या संपूर्ण घटनेदरम्यान रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) आणि जीआरपीचे अधिकारी स्थानकावर उपस्थित होते. मात्र, त्यांनी या गोंधळात हस्तक्षेप करण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. त्यामुळे रेल्वे सुरक्षा व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर या घटनेमुळे केवळ रेल्वे कर्मचाऱ्यांच्या नव्हे, तर प्रवाशांच्या सुरक्षेवरही प्रश्न निर्माण झाला आहे. जर अशा प्रकारच्या हल्ल्यांवर वेळेत कारवाई झाली नाही, तर रेल्वे प्रशासनाची विश्वासार्हता कमी होऊ शकते. या घटनेनंतर रेल्वे प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाला कठोर पावले उचलावी लागतील. रेल्वेतील सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. कर्मचाऱ्यांवर हल्ले होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. रेल्वे प्रशासनाने यावर त्वरित कारवाई न केल्यास भविष्यात असे प्रकार वारंवार घडण्याची शक्यता आहे. आता प्रशासन प्रवाशांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी कोणते पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लघवीमध्ये जळजळ होणे हे किडनी स्टोनमुळे आहे की यूटीआयमुळे आहे हे कसे ओळखावे ?

अनेक वेळा तुम्हाला लघवी करताना लघवीमध्ये जळजळ जाणवली असेल. जेव्हा तुम्हाला किडनी स्टोन किंवा यूटीआय असतो तेव्हा हे प्रामुख्याने अनुभवायला मिळते. पण लघवी करताना जळजळ होणे हे किडनी स्टोन आणि यूटीआय दोन्हीमुळे होऊ शकते. परंतु त्यांच्या लक्षणांमध्ये काही सामान्य फरक आहेत, जसे की यूटीआयमध्ये लघवी करताना जळजळ होणे आणि लघवीला दुर्गंधी येणे. त्याच वेळी, किडनी स्टोनमुळे पाठीत किंवा बाजूला तीव्र वेदना, लघवीत रक्त येणे आणि उलट्या झाल्यासारखे वाटू शकते. जर तुम्हाला ही समस्या अनेक दिवसांपासून जाणवत असेल तर त्यावर उपचार करण्यासाठी



ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या. आता प्रश्न असा उद्भवतो की लघवीमध्ये जळजळ होणे हे किडनी स्टोनमुळे आहे की यूटीआयमुळे आहे हे आपल्याला कसे कळेल?

### किडनी स्टोनची कारणे

सामान्यतः, जेव्हा मूत्रातील खनिजे आणि क्षार क्रिस्टल्सच्या स्वरूपात जमा होऊ लागतात तेव्हा तुम्हाला किडनी स्टोन होतात. मूत्रपिंडातील दगडांची काही मुख्य कारणे म्हणजे अपुरे पाणी पिणे, अस्वास्थ्यकर जीवनशैली आणि योग्य अन्न न खाणे.

### मूत्रमार्गाचा संसर्ग

हा संसर्ग मूत्रमार्ग, मूत्राशय किंवा मूत्रपिंडात होऊ शकतो. सहसा हे बॅक्टेरियामुळे होते. पुरुषांपेक्षा महिलांना मूत्रमार्ग आणि गुद्द्वार एकमेकांच्या खूप जवळ असल्याने, मूत्रमार्गातील काही घाण मूत्रमार्गातून बाहेर पडते, त्यामुळे त्यांना मूत्रमार्गाच्या संसर्गाचा धोका जास्त असतो. लघवी करताना जळजळ होणे, रंग बदलणे, तीव्र वास येणे, पेल्विक भागात वेदना होणे, ताप येणे, मळमळ होणे इत्यादी ही त्याची मुख्य लक्षणे आहेत.

### मूत्रासोबत रक्त येणे

लघवीमध्ये रक्त येण्याच्या समस्येला (मासिक पाळीमुळे नाही) वैद्यकीय भाषेत हेमॅटुरिया म्हणतात. लघवीसोबत येणाऱ्या रक्ताचा रंग सामान्य रंगापेक्षा थोडा वेगळा असू शकतो. खालच्या ओटीपोटात वेदना आणि लघवी करण्यास अडचण येणे ही या समस्येची मुख्य लक्षणे आहेत. किडनी स्टोन किंवा मूत्राशयाच्या संसर्गामुळेही अशी समस्या उद्भवू शकते.

### लघवी करताना तीव्र जळजळ किंवा वेदना

जर तुम्हाला काही काळापासून लघवी करताना तीव्र जळजळ होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. लघवी करताना वेदना किंवा जळजळ होणे हे किडनी स्टोनच्या महत्वाच्या लक्षणांपैकी एक आहे. खरं तर, जेव्हा दगड मूत्रमार्ग आणि मूत्राशयाच्या दरम्यानच्या भागात पोहोचतो, तेव्हा त्या व्यक्तीला लघवी करताना तीव्र वेदना किंवा जळजळ जाणवू लागते

# धाडस करा, कर्जमुक्तीसाठी काय घाबरता?

# सुधीर मुनगंटीवार यांचे थेट सरकारला सवाल




**मुंबई :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आज थेट सरकारलाच खडेबोल सुनावलं. कर्जमुक्तीसाठी काय घाबरता, धाडस करा ना, असं सुधीर मुनगंटीवार सभागृहात म्हणाले. सुधीर मुनगंटीवार हे भाजपचे ज्येष्ठ नेते आहेत. तसेच ते माजी मंत्री आहेत. असं असताना सुधीर मुनगंटीवार हे वारंवार सरकारला विधानसभेच्या सभागृहात घेरताना दिसत आहेत. गेल्या आठवड्यात सुधीर मुनगंटीवार यांनी धान उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी या मागणीसाठी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यावर घणाघात केला होता. बीडचा फरार असलेला खोक्या भाईने एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली पण तो पोलिसांच्या हाती लागला नाही. त्यामुळे पत्रकारांनाच पोलिसाचा दर्जा द्या, अशी खोचक मागणी सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारकडे केली होती या सगळ्या घडामोडींनंतर सुधीर मुनगंटीवर आज पुन्हा सभागृहात शेतकरी कर्जमाफीसाठी आक्रमक झालेले बघायला मिळाले.शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी का घाबरता? धाडस दाखवा, असं सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला उद्देशून स्पष्ट म्हटलं. कर्जमुक्तीसाठी फक्त २० हजार कोटी रुपये खर्च येणार असल्याचं सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी सभागृहात सांगितलं. तसेच कर्जमुक्ती देणार नाही ही भूमिका योग्य नसल्याचंदेखील सुधीर मुनगंटीवार यांनी भर सभागृहात म्हटलं आहे.

माझी मागणी आहे, अरे डेअरिंग करा. कर्जमुक्तीसाठी काय घाबरता? ही कर्जमुक्ती देण्याची आवश्यकता आहे आणि हे मी सांगू शकतो. कर्जमुक्तीसाठी किती खर्च येणार आहे? तर २० हजार कोटी. २०२३-२४ मध्ये वेतनावरचा खर्च हा १ लाख ४२ हजार ७१८ कोटी होती. आता २०२५ मध्ये किती वाढ केली, १ लाख ७२ हजार ७६० कोटी. निवृत्ती वेतनात दोन वर्षात किती वाढ झाली? १३ हजार ५६५ कोटी. एका वर्षात आपण २९,८८१ कोटींची वाढ देतो. वाढ देताना तिजोरीत पैसे नाहीत आणि आपण कर्जमुक्ती देणार नाही ही काही योग्य भूमिका होणार नाही, अशी रोखठोक भूमिका सुधीर मुनगंटीवार यांनी सभागृहात मांडली.

# शाहरुख खान-ऐश्वर्याच्या त्या सिनेमामुळे मुंबईत रद्द झालेली शेकडो लग्न...


**मुंबई:** भारतासारख्या सिनेमाप्रेमी देशात वर्षाला शेकडो चित्रपट तयार होतात आणि या प्रत्येक चित्रपटाची पडद्यामागची एक कहाणी, एखादा किस्सा असतोच. एका मोठ्या पिढीचा आवडता अभिनेता असणाऱ्या शाहरुख खानच्या चित्रपटांचे तर असे अनेक किस्से आहेत. शाहरुख आणि ऐश्वर्या राय यांच्या लोकप्रिय सिनमामुळे मुंबईत शेकडो लग्ने थांबली होती आणि मोठा गोंधळही निर्माण झालेला. जाणून घ्या हा सिनेमा कोणता आणि नेमका काय प्रकार घडला होता? संजय लीला भन्साळी दिग्दर्शित चित्रपटांपैकी एक असलेल्या देवदासमुळे २००१ मध्ये मुंबईत शेकडो लग्ने थांबवावी लागल्याचा एक अजब किस्सा आहे. देवदास मध्ये मोठे महाल, चमकणारे झुंबर आणि विशेष प्रकाशयोजनेने सजवलेले देखावे असा सेट पाहायला मिळाला होता. शरत चंद्र यांच्या कादंबरीवर आधारित देवदास चित्रपटात शाहरुख खान, ऐश्वर्या राय आणि माधुरी दीक्षित यांच्या मुख्य भूमिका होत्या. या चित्रपटात जॅकी श्रॉफदेखील एका महत्त्वाच्या भूमिकेत होते. या चित्रपटाचे सिनेमॅटोग्राफर विनोद प्रधान यांनी अलीकडेच देवदासच्या निर्मितीबद्दल फ्रायडे टॉकीजशी संवाद साधला.मुंबईत उभारण्यात आलेल्या चंद्रमुखीच्या वाड्याच्या सुमारे १ किलोमीटर लांबीच्या सेटबद्दल प्रधान यांनी भाष्य केले. त्यांनी म्हटले की, माझे सहाय्यक सेट कसा बांधला जात आहे ते पाहण्यासाठी गेले आणि आम्हाला धक्काच बसला. आम्ही तो सेट कसा प्रकाशित याचा विचार करत होतो. मी तलावाच्या



किनाऱ्यावरून सेटची एक फेरी मारली. सर्वात आधी तिथे १०० वॅटचा बल्ब लावण्यास सांगितला आणि अशाप्रकारे आम्ही सेटवर लाइट व्यवस्था करण्यात सुरुवात केली. असं म्हणतात की, मी त्या सेटसाठी मुंबईत उपलब्ध असलेले सर्व जनरेटर वापरले.प्रधान म्हणाले की, त्यासाठी मुंबईतील जवळपास सर्व जनरेटर त्यांच्याकडे आले होते, परिणामी मुंबईत होणारी अनेक लग्न पुढे ढकलण्यात आली. प्रधान म्हणाले की, तो इतका मोठा परिसर होता... त्यामुळे तेव्हा ते असं म्हणायचे की, विनोदजींमुळे अनेक लग्ने रद्द झाली कारण लग्नात वापरण्यासाठी जनरेटर नव्हते.

देवदास हा चित्रपट सुमारे ५० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवण्यात आला होता. त्यावेळी हा सर्वात महागडा भारतीय चित्रपट असल्याचे म्हटले जात होते. २००२ च्या कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रीमियर झाल्यानंतर, तो जुलै २००२ मध्ये जगभरात प्रदर्शित झाला. हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला आणि जगभरात त्याने सुमारे १६८ कोटी रुपये कमावले.

# होळी का साजरी करतात? पूजाविधी,महत्व



मराठी वर्षाचे सरते शेवटी फाल्गुन पौर्णिमेस साजरी होणारी होळी हुताशनी पौर्णिमा, शिमगा, या नावाने ओळखली जाते, अपप्रवृत्ती ना नष्ट करून त्यावर विजय मिळवल्याचा उत्सव साजरा करणारा हा सण खरेतर जुने जे जे वाईट असेल ते सोडून नव्याचे स्वागता साठी सिद्ध होण्याच हा सण. सृष्टी ही या काळात बदलत असते, वृक्ष आपली जीर्ण झालेली जुनी पाने त्यागून नवी धारण करीत असतात अनेक झाडांना मोहर आलेला असतो. फाल्गुनी पौर्णिमेपासून पंचमीपर्यंतच्या ५ ६ दिवसांत कुठे दोन दिवस तर कुठे पाचही दिवस हा उत्सव साजरा केला जातो. जाणून घेऊया होळी कशी साजरी केली जाते पूजाविधी, इतिहास, महत्व आणि मान्यता...

काही वर्षांपूर्वीपर्यंत होळी जवळ आली की घरोघरी शेणाच्या चाकोल्या होत असलेल्या दिसायच्या त्या वेळी दोन होळ्या पेटायच्या. एक छोटी आणि एक मोठी. होळीच्या साधारण पंधरा-वीस दिवस आधी चाकोल्यांसाठी घरातील लहान मुले शेण गोळा करायची. या चाकोल्यांना मध्यभागी मोठे छिद्र केले जायचे. होळी येईपर्यंत या चाकोल्या खणखणीत वाळलेल्या असायच्या. मग नारळाच्या दोरीत त्या या चाकोल्या ओवून त्याची माळ तयार करायची. एका माळेत साधारण २०-२५ चाकोल्या असायच्या. आई- बहिणीसोबत लहान मुले होळीच्या पूजेला जायची त्यावेळी मग या चाकोल्यांच्या माळा होळीत टाकल्या जाचच्या. दुसऱ्या दिवशी या जळलेल्या पण धग कायम असलेल्या चाकोल्यांवर पाणी गरम करायचे आणि त्या पाण्याने आंघोळ केली जायची.

होलिका दहन करण्यापूर्वी तिचे पूजन करण्यात येते. होलिकेजवळ जाऊन पूर्व किंवा उत्तरेकडे मुख करून बसून पूजा करण्यात येते. होलिकेस चारही बाजूने तीन किंवा सात फेर धरून कच्च्या धाग्याने बांधण्यात येते. शुद्ध पाणी व अन्य पूजा साहित्य एक एक करून होलिकेस समर्पित करण्यात येते. पूजेनंतर एक कलश पाणी, अक्षता, गंध, पुष्प, गूळ, साबुदाणा, हळद, मुग, बत्तासे, गुलाल, नारळ, पुरणपोळी इत्यादींची आहुती देण्यात येते. नवीन धान्याचा अंश जसे, गहू, चणे इत्यादींच्या लोंबी यांचीही आहुती देण्यात येते.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रविंद्र धंगेकरांनंतर ठाकरे गटाच्या फायरब्रँड नेत्या शिवसेनेच्या गळाला, एकनाथ शिंदेंचं पारडं आणखी जड होणार...

**पुणे :** एकनाथ शिंदे यांना पुणे जिल्ह्यात दोन दिवसात दुसऱ्यांदा लॉटरी लागली आहे. कसब्याचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांना आपल्याकडे खेचण्यात एकनाथ शिंदे यशस्वी ठरल्यानंतर आता पिंपरी चिंचवडमधील फायरब्रँड नेत्या शिवसेनेच्या गळाला लागल्या आहेत. ठाकरे गटाच्या जिल्हा संघटक सुलभा उबाळे आज शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश पार पडणार आहे. यावर सुलभा उबाळेंनी भूमिका स्पष्ट केली आहे. शहरातील तिन्ही मतदारसंघ पक्षाने सोडून दिल्यामुळे शहरात पक्षाचे अस्तित्वच शिल्लक राहिलेले नाही, पक्षनेतृत्व शहराकडे लक्ष देत



नाहीत. त्यामुळे काम करण्यास थोडी सुद्धा संधी शिल्लक नाही. त्यामुळे पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. आज संध्याकाळी शिवसेनेत प्रवेश करणार आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी एक वृत्तवाहिनीला दिली आहे. दरम्यान रवींद्र धंगेकर यांनी नुकताच शिवसेनेत पक्षप्रवेश केला आहे. गेल्या काही दिवसांपासून ते शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. अखेर त्यांनी शिवसेनेत प्रवेश करत चर्चांना पूर्णविराम दिला आहे. धंगेकरांनी काँग्रेसला सोडचिट्ठी दिल्याने पक्षसंघटनेला मोठा धक्का आहे. तर धंगेकरांमुळे शिवसेनेचे पारडे मात्र जड झाले आहे. आगामी स्थानिक निवडणुकांच्या अनुषंगाने यामुळे शिवसेनेला मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. यातच आता सुलभा उबाळेंमुळे शिवसेनेचे पारडे आणखी जड होणार आहे.सुलभा उबाळेंनी १९९२ मध्ये शिवसेना शाखा प्रमुख म्हणून राजकारणात पाऊल ठेवले होते. १९९७ साली त्या नगरसेवक झाल्या. तर १९९८ साली पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विरोधी पक्षनेत्याची धुरा सांभाळली. २००७ ते २०१२ या कालावधीत त्यांनी शिवसेना गटनेता, स्थायी समिती सदस्य म्हणून काम पाहिले.तर २००९ साली भोसरी विधानसभा निवडणुकीत अवघ्या १२७२ मतांनी पराभव मानावा लागला होता. पुढे २०१४ ते २०१७ त्यांनी पुन्हा पक्षाच्या गटनेता म्हणून काम केले. २०१४ पुन्हा भोसरी विधानसभा निवडणुकीत त्यांना भोसरी मतदारसंघातून पराभव पत्करावा लागला. तसेच त्यांनी शिवसेना शहर संघटिका पिंपरी चिंचवड म्हणून ५ वर्ष काम पाहिलं आहे. जिल्हा संघटिका म्हणून २०१७ ते आजतगायत कार्यरत आहेत.

# होळी खेळण्यापूर्वी केसांना काय लावावे? शहनाज हुसेनने दिल्या भन्नाट टिप्स....



काही दिवसांवर होळीचा सण येणार आहे. अशा परिस्थितीत लोकांनी आधीच तयारी सुरू केली आहे. होळीच्या दिवशी रंग आणि गुलाल खेळले जातात. कधीकधी हे रंग इतके तीव्र असतात की ते सहजासहजी निघत नाहीत. होळीच्या निमित्ताने संध्याकाळी नवीन कपडे घालण्याची परंपरा देखील आहे. अशा परिस्थितीत, संध्याकाळी अनेक ठिकाणी नवीन कपड्यांसह गुलालही वाजवला जातो. अशा परिस्थितीत, अनेक वेळा, नवीन कपड्यांसोबत, कायमचे रंग देखील त्वचेवर जातात, जे काढणे खूप कठीण असते. अशा परिस्थितीत, जर होळीच्या दिवशी तुमच्यावर कायमचे रंग लागले तर काळजी करू नका. यासाठी आम्ही तुमच्यासाठी शहनाज हुसेन यांनी सांगितलेले हे उपाय नक्की करा.





**कोरफड जेल..**

तुमच्या त्वचेवरील आणि केसांवरील होळीचा रंग काढून टाकण्यासाठी तुम्ही कोरफडीचे जेल देखील वापरू शकता. यासाठी तुम्हाला तुमच्या संपूर्ण त्वचेवर कोरफडीचे जेल लावावे लागेल. तुम्ही ते तुमच्या केसांमध्येही वापरू शकता. ते लावल्यानंतर अर्ध्या तासाने स्वच्छ पाण्याने धुवा. यामुळे तुमच्या त्वचेवरील कायमचा होळीचा रंग निघून जाईल.

**लिंबू**

लिंबू हे नैसर्गिक ब्लीचिंग एजंट आहे. होळीच्या वेळी कपड्यांवरील लहान रंगाचे डाग काढण्यासाठी तुम्ही लिंबाचा रस वापरू शकता. यासाठी लिंबाचा रस काढा आणि तो तुमच्या कपड्यांवर नीट लावा. काही वेळाने हे कपडे गरम पाण्याने धुवा. यामुळे रंग बऱ्याच प्रमाणात निघून जातो. हट्टी रंग काढून टाकण्यासाठी लिंबू काम करू शकत नाही.

**बेकिंग सोडा**

होळीचे रंग काढून टाकण्यासाठी बेकिंग सोडा देखील उपयुक्त ठरू शकतो. यासाठी, एका बादलीत गरम पाण्यात थोडा बेकिंग सोडा घाला. नंतर होळीच्या रंगाने खराब झालेले कपडे त्यात घाला आणि दीड तास तसेच राहू द्या. यानंतर, कपडे पाण्याबाहेर काढा आणि साबणाने स्वच्छ करा, म्हणजे होळीचा रंग निघून जाईल.

**काकडी वापरा**

रंग काढून टाकण्यासाठी काकडीचा वापर देखील फायदेशीर आहे. यासाठी काकडीचा रस काढा आणि त्यात थोडे गुलाबजल आणि एक चमचा व्हिनेगर घालून पेस्ट तयार करा. याने चेहरा धुतल्याने तुमच्या चेहऱ्यावरील हट्टी रंग निघून जातील आणि तुमच्या चेहऱ्यावर चमक येईल.

**केसांना आणि त्वचेला मोहरीचे तेल लावा**

होळी हा रंगांचा सण आहे, पण हे रंग कधी कधी त्वचेसाठी आणि केसांसाठी हानिकारक ठरू शकतात त्यामुळे त्वचा आणि केसांचे नुकसान टाळण्यासाठी होळी खेळण्याच्या आधी मोहरीचे तेल लावणे खूप महत्त्वाचे आहे. त्वचेला संरक्षण मिळते मोहरीचे तेल त्वचेवर एक संरक्षक थर तयार करते, ज्यामुळे रंग त्वचेला खोलवर जिरत नाही. त्यामुळे नंतर रंग सहज धुवून टाकता येतो.

केसांच्या आरोग्यासाठी फायदेशीर रंगांमधील केमिकल्स केसांना कोरडे आणि निस्तेज करतात.

तेलामुळे केस मऊ राहतात आणि रंगाचा दुष्परिणाम टाळता येतो. कोरडेपणा आणि ॲलर्जीपासून बचाव काही रंगांमध्ये केमिकल्स असतात जे त्वचेला कोरडेपणा, खाज किंवा ॲलर्जी देऊ शकतात. मोहरीच्या तेलामुळे त्वचा ओलसर राहते आणि असे त्रास कमी होतात. रंग सहज निघून जातो तेलाचा थर असल्यामुळे रंग त्वचेला घट्ट चिकटत नाही आणि आंघोळीच्या वेळी सहज निघून जातो.

**त्वचेतूनही रंग निघेल**

त्वचेवरील रंग काढून टाकण्यासाठी, तुमच्या त्वचेवर लिंबू हलक्या हाताने चोळा आणि १५ मिनिटे तसेच राहू द्या आणि नंतर भरपूर मॉइश्चरायझर लावा. मॉइश्चरायझरऐवजी क्लिंझर देखील वापरता येते. नंतर रसायनमुक्त साबण आणि कोमट पाण्याने आंघोळ करा. रंग सहज निघून जाईल.

# अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांचा जिल्हा दौरा

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम हे दि. १३ मार्च २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे. गुरुवार दि. १३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता मुख्याधिकारी, मलकापूर नगरपरिषद यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी. दुपारी १२.३० वाजता मुख्याधिकारी, खामगांव नगरपरिषद यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी. दुपारी १.३० ते २.३० वाजेपर्यंत राखीव. दुपारी २.३० वाजता मुख्याधिकारी, चिखली नगरपरिषद यांचे सोबत आढावा व कामची पाहणी. दुपारी ३.३० वाजता मुख्याधिकारी शेगांव नगरपरिषद यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी. त्यानंतर सोयीनुसार नागपूरकडे रवाना होतील.

# यशवंतराव चव्हाण यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

जनसंचलन/बुलढाणा



देशाचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, अजिक्य गोडगे यांच्यासह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# कर्जमाफीसाठी शेतकरी बुधवारी पोहोचणार मुंबईत..!

## १९ मार्च रोजी मुंबईत होणार आंदोलन रविकांत तुपकरांच्या नेतृत्वात १८ मार्च रोजी सकाळी करणार आगेकूच..!

जनसंचलन/बुलढाणा

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, पिकविमा, सोयाबीनचा -कापसाचा भावफरक यासह सोयाबीन- कापूस, ऊस, कांदा, धान, दूध उत्पादकाना मदत व भाववाढ आणि शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांसाठी शेतकरी १९ मार्च रोजी मुंबईत धडक देणार आहेत. रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात अरबी समुद्रात सातबारे बुडवून शेतकरी कर्जमुक्त झाल्याची घोषणा करणार आहेत तसेच सोयाबीन कापूस बुडवून शासनाचे लक्ष वेधणार आहेत. या आंदोलनाची उस्फुर्त तयारी करण्यात येत असून गावागावातील शेतकरी मुंबईला जाण्यासाठी उत्सुक असल्याचे दिसून येत आहे. १८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता बुलडाणा शहरातील क्रांतिकारी हेल्पलाइन सेंटर वरून रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात सर्व शेतकरी मुंबईकडे आगेकूच करणार आहेत. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पुणे येथील ०३ मार्च रोजी पार पडलेल्या राज्यव्यापी बैठकीत रविकांत तुपकर यांनी १९ मार्च रोजी मुंबईत आंदोलनाचा बॉम्ब फोडणार असल्याची घोषणा केली होती. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, शेतकऱ्यांच्या हक्काचा पिकविमा, सोयाबीन- कापूस भावफरक, नाफेड मध्ये अडकलेली शेतकऱ्यांची रक्कम, रखडलेले अनुदान, ऊसाला एकरकमी एफआरपी द्यावी यासह कांदा, दूध, धान व इतर उत्पादनाना मदत मिळण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या समस्यांसाठी मुंबईत धडक देण्याचा इशारा रविकांत तुपकर यांनी दिला होता. १८ मार्चपर्यंत त्यांनी सरकारला वेळ दिला होता, परंतु अद्याप सरकार कडून कोणताच सकारात्मक प्रतिसाद नसल्याने रविकांत तुपकर यांनी आंदोलनाची ठाम भूमिका घेतली आहे. १९ मार्च रोजी मुंबईतील नरिमन पॉईंट येथे अरबी समुद्रात आपले सातबारे बुडवून शेतकरी स्वतः ला कर्जमुक्त झाल्याचे घोषित करणार आहेत तसेच सोयाबीन आणि कापूस समुद्रात बुडवून शासनाचे लक्ष वेधणार आहेत. या आंदोलनासाठी गावागावातून शेतकरी मोठ्या संख्येने बाहेर पडण्याची शक्यता आहे . १८ मार्च रोजी सकाळी नऊ वाजता बुलढाणा येथील क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या हेल्पलाइन सेंटर समोर सगळे शेतकरी एकत्र जमणार आहेत व तेथून रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात मुंबईकडे आगेकूच करणार आहेत. रात्री मुंबईच्या वेशीवर मुक्काम करून १९ मार्च रोजी सकाळी रविकांत तूपकरांचे नेतृत्वात सगळे शेतकरी नरिमन पॉईंट येथे अरबी समुद्रावर पोहोचणार आहेत. आम्ही शांततेच्या मार्गाने आमचा हक्क मागण्यासाठी जात आहोत त्यामुळे पोलिसांनी उगीच आडवा - आडवी करू नये, आम्हाला मुंबईत जाण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील असा इशाराही रविकांत तुपकर यांनी दिला आहे. यापूर्वी ज्या ज्या वेळी रविकांत तुपकरांनी मुंबईत शेतकऱ्यांसह धडक



दिली त्या त्यावेळी शेतकऱ्यांच्या पदरात काही ना काही पडले आहे. गत वेळी रविकांत तुपकर यांनी केलेल्या आंदोलनामुळे कंपनीने सन २०२३ च्या खरीप हंगामातील पात्र दोन लाख २४ हजार ४८२ शेतकऱ्यांच्या खात्यावर १३५ कोटी ५१ लाख रुपये पिक विमा जमा केला होता तर रब्बी हंगामातील पात्र शेतकऱ्यांना १२५ कोटी २२ लाख रुपयांचा पिक विमा मिळाला होता. रविकांत तुपकरांचे बहुतांश आंदोलने सफल होऊन शेतकऱ्यांना मदत मिळाल्याचे यापूर्वी काही वेळा सिद्ध झाले आहे,भांडल्या शिवाय काही मिळत नाही, घरात बसून न्याय मिळणार नाही,त्यामुळे आपला हक्क मिळवून घेण्यासाठी शेतकऱ्यांनी मुंबईच्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रविकांत तुपकरांनी केले आहे.

# २००५ च्या बॅचचे सेवेतील २० वर्षे पूर्ण : जुन्या आठवनींना दिला उजाळा...

## पोलिस कर्मचाऱ्यांचा सहपरिवार स्नेहसंमेलन

जनसंचलन/ देऊळगाव राजा

पोलिस बॅच नागपूर शहर २००५ च्या पोलिस सेवेचे २० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल स्नेहसंमेलन कार्यक्रम पार पडला. रविवारी (दि. १) बुलढाणा जिल्ह्यामधील नागपूर शहर येथे मार्च २००५ साली पोलिस दलामध्ये भरती झालेले पोलिस कर्मचाऱ्यांनी सहपरिवार (गेट टुगेदर) स्नेहसंमेलनचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन देऊळगावराजा पोलिस ठाण्यातील कार्यरत पोलिस हेडकॉन्स्टेबल माधव




कुटे व शिवानंद मुंडे यांनी परिश्रम घेऊन आयोजित केला होता.

या दरम्यान श्री गजानन महाराज यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बॅचमधील काही पोलिस कर्मचारी हे अधिकारी पदावर नियुक्ती होऊन कार्यरत आहे. त्यापैकी बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार अमर नागरे व त्यांच्या पत्नी मंदाकिनी अमर नागरे यांचा सत्कार, महामार्ग पोलिसचे पोलिस हेड कॉन्स्टेबल विठ्ठल काळुसे व ज्योती विठ्ठल काळुसे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. संचालन मलकापूर ग्रामीण पोलिस स्टेशनचे हेड मोहरर दीपक नाफडे यांनी केले.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांची शहरातुन मोटारसायकल रॅली...

## मराठा अर्बनचे अध्यक्ष श्री. बाळकृष्ण जेऊघाले यांच्या तर्फे ५० हेल्मेटची भेट...





जनसंचलन/बुलढाणा

०८ मार्च जागतीक महिला दिनाचे औचीत्य साधुन मा. विश्व पानसरे पोलीस अधीक्षक बुलढाणा, मा. बी.बी.महामुनी अपर पोलीस अधीक्षक बुलढाणा यांचे मार्गदर्शनाखाली महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक कक्ष बुलढाणा यांचेवतीने बुलढाणा पोलीस घटकातील महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांची बुलढाणा शहरातुन मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर मोटारसायकल रॅलीमधुन बेटी बचाव बेटी पढाओ, महिला हेल्पलाईन १०९१,११२ व मोनं ८६९८०००११ तसेच हेल्मेट वापराबाबत जनजागृती करण्यात आली. सदर मोटारसायकल रॅलीमध्ये बुलढाणा पोलीस दलातील ०६ महिला अधिकारी व ५० महीला पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेतला सहभागी महिला अधिकारी अंमलदार यांना मराठा अर्बन बुलढाणा परीवारातर्फे महिला दिनाचे निमीत्ताने ५० हेल्मेटची भेट म्हणुन देण्यात आले. त्याकरीता मराठा अर्बनचे अध्यक्ष श्री. बाळकृष्ण जेऊघाले यांचे बुलढाणा पोलीस दलातर्फे आभार मानण्यात आले. तसेच महिला पोलीस अंमलदार योगीता शेळके यांनी सन २०२५ चा महाराष्ट्र शासनाचा बालस्नेही पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सदर महिला दिन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती गायत्री सावजी यांनी केले.

# महिला सन्मान मोटारसायकल रॅलीत रश्मिका मंदानाचा संभाव्य सहभाग...

जनसंचलन/बुलढाणा



पार्वती सुतभक्त गणेश मंडळ आणि जगदंब ढोल पथक यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदू नववर्ष गुढीपाडवा मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी महिला सन्मान मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष रॅलीमध्ये महिलांच्या सामर्थ्याला व समाजातील त्यांच्या योगदानाला सलाम केला जाणार आहे. यावर्षीच्या या भव्य आयोजनाचे मुख्य आकर्षण म्हणजे लोकप्रिय अभिनेत्री रश्मिका मंदाना यांचा सहभाग होण्याची शक्यता आहे. रश्मिका मंदाना या छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपटात संभाजी महाराज यांच्या पत्नीची भूमिका साकारल्याने, त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला अधिक ग्लॅमर व प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा आहे. सध्या त्यांच्यासोबत फोनवर चर्चा सुरू असून, त्या रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी उत्सुक असल्याचे सांगितले जात आहे. गुढीपाडव्याच्या पारंपरिक वेशभूषेत महिलांचा उत्साह, ढोल पथकाचा गजर, आणि या भव्य रॅलीच्या माध्यमातून महिलांच्या सन्मानासाठी प्रेरणादायी संदेश दिला जाणार आहे. दरवर्षीप्रमाणे ही रॅली फक्त महिलांसाठी असून, तिचा उद्देश महिलांच्या आत्मविश्वासाला प्रोत्साहन देणे आणि समाजात स्त्रियांबद्दल सन्मान वाढवणे हा आहे. या उपक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम एक वेगळा संदेश देणार आहे.

# तिजोरी लुटणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले!

जनसंचलन/बुलढाणा



सोयाबीन, कापूस, तूर उत्पादक शेतकऱ्यांनी मतदान करून ज्यांना मंत्री बनवले त्यांनीच शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे.तिजोरी लुटणाऱ्या सत्ताधारी सरकार मधील एकही मंत्री यासंदर्भात बोलत नाही. केवळ सुलभा खोडके बोलल्या आहेत,असा हल्लाबोल आमदार सिद्धार्थ खरात यांनी सभागृहात केलाय. स्वत:मध्ये मश्गूल असलेल्या सरकारला शेतकरी बांधव त्याच्या जीवनातल्या सर्वात मोठ्या संकटाला सामोरे जात आहे याची साधी जाणीवही नाही. अशा परिस्थितीत शेतकरी बांधवांना टोकाची भूमिका घेण्यास भाग पडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवर राहील,असेही ते म्हणाले. शेतीत उत्पादन खर्च अधिक होत असल्याने दराअभावी फारसे शिल्लक राहत नाही. शेतीमालाच्या हमीभावाबाबत ठोस निर्णय व्हायला हवा.आज शेतकऱ्यांच्या घरात अर्धी अधिक सोयाबीन पडलेले आहेत. मालाला भाव नाही.त्यांनी आपल्या मुला मुलीचे लग्न किंवा इतर खर्च कसा भागवावा? हा गंभीर प्रश्न आहे.याकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले.

# राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची महावितरणच्या ३३/११ के.व्ही. उपकेंद्राला शैक्षणिक भेट

जनसंचलन/बुलढाणा




द्वारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास फाउंडेशन द्वारा संचालित राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय बुलढाणा येथील अध्यक्ष श्री. धृपदरावजी सावळे साहेब व प्रबंधक सौ. कीर्तीताई पऱ्हाड (सावळे) , अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य जे. पी. कावरे तसेच तंत्रनिकेतन विभागाचे प्राचार्य पी. एस. राणे, अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. बी. व्हि. नरवाडे तसेच सिव्हिल विभागाचे विभाग प्रमुख प्रा. नितीन पायघन, इलेक्ट्रिकल विभागाचे विभाग प्रमुख प्रा.रामेश्वर मोळे, संगणक विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. पूनम इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ६ मार्च २०२५ रोजी सागवान येथील ३३/११ के.व्ही. महावितरण उपकेंद्राला विविध अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक भेट दिली. या दौर्‍यात विद्यार्थ्यांनी विद्युत वितरण प्रणाली, ट्रान्सफॉर्मर ऑपरेशन आणि उपकेंद्रातील तांत्रिक बाबींचे प्रत्यक्ष ज्ञान घेतले. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना विद्युत उपकेंद्राच्या कार्यप्रणाली विषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी ट्रान्सफॉर्मर, स्विचगियर, संरक्षण यंत्रणा आणि वीज पुरवठा व्यवस्थापन यावर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी वीजपुरवठ्याच्या सातत्य, देखभाल आणि सुरक्षितता उपायांबद्दल प्रश्न विचारले, त्यावर अधिकाऱ्यांनी सविस्तर उत्तरे दिली. या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तांत्रिक ज्ञान मिळाले असून, त्यांना औद्योगिक क्षेत्रातील व्यावहारिक अनुभव मिळण्यास मदत झाली. उपस्थित विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शना बद्दल आभार मानले. या भेटीत महावितरणचे अधिकारी श्री. गणेश राणे तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. या भेटीसाठी इलेक्ट्रिकल विभागाच्या प्राध्यापिका मोनाली ढोके यांच्या साह्याने या भेटीचे आयोजन करण्यात आले तसेच या भेटीसाठी प्रा. नितीन पायघन, प्रा. रामदास चोपडे, प्रा. प्रियंका रसाळ,प्रा. आकाश पोपळघट, प्रा. सपना जाधव, , प्रा.आरती दांडगे, प्रा. नयन इंगळे, श्री. विशाल शिंदे (कार्यालयीन अधीक्षक) तसेच प्रयोगशाळा सहाय्यक कैलास लडके, भुषण चितवार यांचे विशेष सहकार्य लाभले.

# जळगाव परिसरात वृक्षतोड व साठवणुक जोमात,!अधिकारी कोमात,!!

## जळगाव जामोद परिक्षेत्रातील अवैध्य वृक्षतोड व साठवणूक प्रकरणी कारवाई होणार का,?

जनसंचलन/जळगाव जा



वन परिक्षेत्र जळगाव जा परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू असून मोठ्या प्रमाणात वाहतूक करून लाकडे वेग वेगळ्या ठिकाणी साठवनुक केल्या जात आहे याकडे वन परिक्षेत्र अधिकारी कर्मचारी यांचे दुर्लक्ष असल्यामुळे सर्सास परिसरात वृक्षतोड सुरूअसून कर्मचारी व्याऱ्याना वाचविण्याचे कार्य करीत आहेत का,? असा प्रश्न जनतेसमोर उपस्थित केला जात आहे झाडाची अवैध्य वृक्षतोड रेती उत्खनन पर्यावरणाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी उपाय योजना करणे गरजेचे आहे,वरिष्ठ स्तरावरून परिसरातील होत असलेली वृक्षतोड प्रकरणी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे अवैध्य वृक्षतोड व साठवणूक प्रकरणी चौकशी करून कारवाई करावी अशी परिसरातील जनतेची मागणी होत आहे,

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958